॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. २४ मे २०२६ | ■ वर्ष ७ वे ■ अंक १ ला ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये | ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

**✲ सुविचार ✲**
नेहमी सत्याच्या मार्गाने चालणाऱ्याचाच विजय होतो

# भारत संरक्षण उत्पादनाचा सर्वात मोठा निर्यातदार बनेल!

**संरक्षण मंत्री राजनाथ सिंह । शिर्डी येथे 'निबे उद्योग समूहा'च्या तोफगोळा उत्पादन आणि सीएनजी प्रकल्पाचे उद्घाटन**

● **शिर्डी । वीरभूमी –** संरक्षण क्षेत्रात खासगी उद्योगांची गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या कंपन्यांकडून होणारे संशोधन हे संरक्षण क्षेत्रातील उत्पादनांना अधिक मजबूत करीत असल्याने केंद्र सरकारनेही खासगी उद्योगांना पाठबळ देऊन सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे. खासगी उद्योगाचे सामर्थ्य जेवढे वाढेल तेवढी सुरक्षा अधिक मजबूत होईल. यातून भारत देश संरक्षण उत्पादनाचा सर्वात मोठा निर्यातदार बनेल, असा विश्वास केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केला.

शिर्डी येथील औद्योगिक वसाहतीमध्ये 'निबे उद्योग समूहा'च्या वतीने विकसित करण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन आणि सीएनजी प्रकल्पाचे उद्घाटन केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमास भारताचे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान, सभापती राम शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, लेफ्टनंट जनरल संदीप जैन, अनुप सिंघल, डीआरडीओचे सेक्रेटरी डॉ. समीर कामत, केंद्रीय सचिव संजीव कुमार, ब्रह्मविहारीजी महाराज, आ.राणाजगजितसिंह, आ. मोनिका राजळे, आ. विक्रमसिंह पाचपुते, आ. आशुतोष काळे, आ. अक्षय कर्डिले यांच्यासह संरक्षण आणि उद्योग विभागाचे अधिकारी आणि प्रकल्पाचे प्रवर्तक गणेश निबे उपस्थित होते.

आपल्या भाषणात गणेश निबे यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरवपूर्ण उल्लेख करून मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, येथे आल्यानंतर या प्रकल्पाचे महत्त्व आपल्याला समजले. भारतामध्ये बुद्धिमत्तेची कमतरता नाही. असलेल्या साधनांचा उपयोग करून, बुद्धिमत्तेच्या जोरावर भारत देशाला निर्यातदार होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. हे स्पष्ट करून त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राची भूमी ही छत्रपती शिवाजी महाराजांची आहे. सुशासन आणि स्वाभिमानाचा संदेश त्यांनी आपल्याला दिला. आत्मनिर्भर अर्थव्यवस्थेचे मॉडेल शिवाजी महाराजांनी निर्माण करून दाखविले. लढाईसाठी लागणारे साहित्यही त्यांनी स्थानिकांकडून बनवून नवे साम्राज्य उभे करून दाखविले. हीच भूमिका लोकमान्य टिळकांची होती. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे हा संदेश देणाऱ्या या महाराष्ट्राच्या भूमीने आता संरक्षण व्यवस्थेतही खासगी उद्योगांच्या माध्यमातून एक नवा विश्वास निर्माण केला आहे.

संरक्षण उद्योग मजबूत होण्यासाठी खासगी उद्योगाला केंद्र सरकारने पाठबळ देण्याचे धोरण घेतले आहे. यामुळे धोरणात्मक सुधारणा होत असून थेट परकीय गुंतवणुकीसही प्रोत्साहन मिळत आहे. परवाना प्रक्रियेचे सुलभीकरण आणि स्वदेशी नीतीला चालना मिळत असल्यामुळेच खासगी उद्योग समूहांचा सहभाग संरक्षण उत्पादनामध्ये चांगल्या पद्धतीने वाढला आहे. हा वाटा आता २५ ते ३० टक्क्यांवर पोहोचला असल्याचे त्यांनी सांगितले. आधुनिक तंत्रज्ञान आणि बुद्धिमत्तेचा वापर करून, खासगी उद्योग समूह करीत असलेली वाटचाल ही ऊर्जा निर्माण करणारी असून, यातूनच विकासाचा रोडमॅप तयार होत आहे. निबे उद्योग समूह यासाठीचे मोठे उदाहरण असून, या उद्योग समूहातून निर्माण होणारे संरक्षण साहित्याचे उत्पादन पाहता हा उद्योग समूह देशासाठी अनेक वर्षांचा माईलस्टोन ठरेल.

भारताचे सामर्थ्य हे आता शिर्डीच्या भूमीतूनही सिद्ध होणार आहे. हा उद्योग केवळ उत्पादनासाठी मर्यादित नाही, तर यातून अर्थव्यवस्था मजबूत होईलच, पण औद्योगिक स्थिरताही मिळेल. अनेक खासगी कंपन्या आता संरक्षण उत्पादनामध्ये भागीदारी करण्यासाठी पुढे येत असल्यामुळे एक 'इको सिस्टिम' निर्माण होत असून, संरक्षण उद्योगही मजबुतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. 'ऑपरेशन सिंदुर मध्ये भारताने आपले सामर्थ्य सिद्ध करून दाखविले आहे. भविष्यातही खासगी क्षेत्राच्या माध्यमातून संरक्षण उत्पादनाची निर्मिती चांगल्या पद्धतीने होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आजचा दिवस देशाकरिता ऐतिहासिक असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' हे जे संदेश दिले होते, ते संरक्षण क्षेत्राने प्रत्यक्षात अमलात आणले आहेत. त्यामुळे देश आता स्वदेशी पद्धतीने बनविलेल्या उत्पादनांचा निर्यातदार बनला आहे. राज्यात चार डिफेन्स कॉरिडॉर तयार करण्यासाठी केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांनी मान्यता दिली आहे. यामुळे आता महाराष्ट्र राज्य संरक्षण उत्पादनात प्रथम क्रमांकाचे राज्य बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच नाशिक, पुणे, नागपूर आणि अहिल्यानगर येथे संरक्षण उद्योग समूह विकसित करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. गणेश निबे यांच्यासारखे युवक या क्षेत्रात करीत असलेले काम भूषणावह आहे. नवीन तंत्रज्ञान आणून देशासाठी काहीतरी निर्माण करण्याची जिद्द त्यांच्यामध्ये आहे. आत्मनिर्भर भारताकरिता नवा आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम 'निबे उद्योग समूह' करीत आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

याप्रसंगी गणेश निबे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आभार मानले. हे प्रदर्शन पाहण्यासाठी जिल्ह्यातील नागरिक आणि विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती. उद्घाटन सोहळ्यापूर्वी भारताचे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान आणि तिन्ही दलांच्या लेफ्टनंट जनरलनी विद्यार्थी, नागरिक आणि विज्ञानप्रेमींशी संवाद साधला.



### संरक्षण उत्पादनाच्या प्रदर्शनाला दिली भेट

■ या प्रकल्पाच्या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसांच्या संरक्षण उत्पादनाच्या प्रदर्शनाला संरक्षण मंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी भेट दिली. निबे उद्योग समुह आणि विविध अंतराष्ट्रीय कंपन्यांमध्ये महत्वपूर्ण करार करण्यात आले. ऑप्टीकल सॅटेलाईट आणि ब्लॅक स्काय कंपनी तसेच सीप्लेन निर्मितीसाठी कॅनेडीयन कंपनी हॅवीलॅन्ड सोबत स्वाक्षरी करण्यात आली.

## SPOT NEWS

### यंदा शाळा १५ ऐवजी २६ जूनला सुरू होणार?

● **मुंबई –** आता विद्यार्थ्यांची उन्हाळी सुटी संपत आली आहे. त्यामुळे त्यांच्यात शाळेला पुन्हा परतण्याचे वेध लागल्याचे दिसून येत आहेत. दरवर्षी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा १५ जूनपासून सुरू होतात. मात्र, यंदा २६ जून रोजी शाळेची पहिली घंटा वाजण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मंत्री पंकज भोयर यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाढत्या उकाड्यामुळे शाळा उशिरा सुरू होणार आहेत. आज विदर्भाला 'रेड अलर्ट' दिला असून तापमानाचा पारा ४७ अंशावर गेला आहे. या परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या सुटीत वाढ करण्यात येणार आहे. मंत्री पंकज भोयर यांनी दिलेल्या माहितीनुसार, विदर्भात सध्या तापमानाचा पारा वाढलेला असून नागरिक उकाड्याने हैरान झाले आहेत. १० जूननंतरही विदर्भात उष्णतेची लाट कायम राहिल्यास शाळांच्या सुरुवातीची तारीख पुढे ढकलण्याचा विचार केला जाईल. म्हणूनच दरवर्षी १५ जूनला सुरू होणाऱ्या शाळा यंदा २६ जूनपासून सुरू करण्याचा शासनाचा विचार आहे. ते पुढे म्हणाले की, शालेय शिक्षण विभाग लवकरच बैठक घेऊन या परिस्थितीचा सखोल अभ्यास करून हा निर्णय घेईल. तापमान दिवसेंदिवस वाढत आहे आणि नागरिकांना उष्माघाताला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करूनच हा निर्णय घेतला जाईल.

### राज्यात डिझेलसाठी पंपांवर शेतकऱ्यांची गर्दी

● **मुंबई –** महाराष्ट्रात पेट्रोल आणि डिझेल टंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत असून विदर्भ, मराठवाडा आणि खान्देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकरी अक्षरश: हवालदिल झाले आहेत. खरीप हंगामाच्या तोंडावर पेरणीपूर्व मशागतीची कामे सुरू असताना ट्रॅक्टरसाठी डिझेल मिळत नसल्याने शेतकऱ्यांना रात्र-रात्रभर डिझेलसाठी पेट्रोल पंपावर रांगेत बसावे लागत आहे. वाशिम जिल्ह्यात सलग नवव्या दिवशी डिझेलसाठी शेतकऱ्यांनी रात्रीपासून रांगा लावल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दुसरीकडे बुलडाणा जिल्ह्यात अकराव्या दिवशीही संकट कायम असून मागणी आणि पुरवठ्यातील तफावतीमुळे परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे दिसत आहे. मे महिन्यात शेती मशागतीसाठी ट्रॅक्टरचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढतो. त्यामुळे डिझेलची मागणी जवळपास २० ते २५ टक्क्यांनी वाढली आहे. मात्र पुरेसा पुरवठा होत नसल्याने अनेक पेट्रोल पंपांवर शेतकरी रात्रंदिवस थांबून डिझेलची वाट पाहत आहेत. काही ठिकाणी गोंधळ आणि वादाचे प्रकारही समोर आले असून तलवारी आणि कोयते काढल्याच्या घटनांमुळे पेट्रोल पंप कर्मचारीही दहशतीत असल्याचे सांगितले जात आहे.

## महागाईचा भडका; पेट्रोल-डिझेलच्या दरात तिसऱ्यांदा वाढ

● **नवी दिल्ली । वीरभूमी –** देशात पुन्हा एकदा आज (शनिवारी) पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ झाली आहे. पेट्रोलच्या दरात प्रति लिटर ८७ पैशांनी, तर डिझेलच्या दरात प्रति लिटर ९१ पैशांनी वाढ झाली आहे. गेल्या दहा दिवसात तिस-यांदा ही दरवाढ झाली आहे. यापूर्वी १५ मे रोजी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रत्येकी ३ रुपयांची वाढ झाली होती. त्यानंतर १९ मे रोजी पेट्रोल ८७ पैशांनी आणि डिझेल ९१ पैशांनी महाग झाले. गेल्या १० दिवसांत पेट्रोल आणि डिझेल अंदाजे ५ रुपयांनी महाग झाले आहे.

आज दिल्लीत पेट्रोलचे दर ८७ पैशांनी वाढून ९८.६४ रुपये प्रति लिटरवरून ९९.५१ रुपये प्रति लिटर झाले आहेत, तर डिझेलचे दर ९१ पैशांनी वाढून ९१.५८ रुपयांवरून ९२.४९ रुपये प्रति लिटर झाले आहेत. भारतातही इंधनाचा तुटवडा असल्याचे दिसत आहे. तर जगभरात कच्च्या तेलाच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. यामुळे आता पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीही वाढल्या आहेत.

## 'नीट २०२६' परीक्षा शुल्क रिफंड प्रक्रिया सुरू

● **नवी दिल्ली । वीरभूमी –** 'नीट २०२६' च्या उमेदवारांसाठी महत्त्वाची बातमी आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने परीक्षा शुल्क परताव्याची प्रक्रिया सुरू केली आहे. उमेदवार आता अधिकृत रजिस्ट्रेशन पोर्टलवर लॉगिन करून आपल्या बँक खात्याची माहिती भरू शकतात. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिफंडची रक्कम थेट उमेदवारांच्या बँक खात्यात जमा होईल. बँक डिटेल्स भरण्याची शेवटची तारीख २७ मे २०२६ रात्री ११: ५० पर्यंत आहे.

३ मे २०२६ रोजी झालेली 'नीट २०२६' परीक्षा अनियमिततांच्या आरोपांमुळे रद्द करण्यात आली होती. आता पुन्हा परीक्षा २१ जून २०२६ रोजी घेण्यात येणार आहे. एनटीएने स्पष्ट केले आहे की, पुन्हा परीक्षा देणा-या सर्व उमेदवारांकडून कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही.

एनटीए या सार्वजनिक नोटिशीनुसार, उमेदवाराने आपल्या लॉगिन आयडी आणि पासवर्डने अधिकृत पोर्टलवर लॉगिन करावे. तिथे ठशर्षीपव डळपज्ञ उपलब्ध आहे. या लिंकद्वारे बँक खात्याची संपूर्ण माहिती भरावी लागेल. ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आहे आणि उमेदवारांनी दिलेल्या माहितीच्या आधारे रिफंड प्रक्रिया राबवली जाईल. यामध्ये खातेधारकाचे पूर्ण नाव, 'आयएफसी' कोड, बँक खाते क्रमांक, बँकेचे नाव, रद्द केलेल्या चेकची स्कॅन कॉपी (पर्यायी).

एनटीएने स्पष्ट केले की, रद्द चेक अपलोड करणे अनिवार्य नाही, परंतु त्यामुळे खात्याची पडताळणी सोपी होते आणि रिफंड प्रक्रिया वेगवान होते.

उमेदवारांना विशेष सूचना दिली आहे की, एकदा बँक डिटेल्स जमा केल्यानंतर त्यात कोणताही बदल करता येणार नाही. म्हणून उमेदवारांनी अकाऊंट नंबर, आयएफसी कोड, नाव इत्यादी माहिती अत्यंत काळजीपूर्वक आणि दोनदा तपासून भरावी. चुकीची माहिती दिल्यास रिफंड प्रक्रिया विलंबित किंवा अडचणीत येऊ शकते.

# शिवसैनिकांकडून कर्जत बाजार समितीच्या उपसभापतींच्या दालनाची तोडफोड

**ठरल्याप्रमाणे पदाचा राजीनामा न दिल्याचा निषेध । नावाची पाटी फेकत ठोकले कुलूप**

● **कर्जत । वीरभूमी –** कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अभय पाटील यांनी ठरल्याप्रमाणे पदाचा राजीनामा न दिल्याच्या निषेधार्थ शनिवारी (दि. २३) शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिवसैनिकांनी बाजार समितीमध्ये जोरदार आंदोलन करत उपसभापतींच्या दालनात घुसून तोडफोड केली. यावेळी संतप्त शिवसैनिकांनी उपसभापती नावाची पाटी काढून फेकत जोरदार घोषणाबाजी केली. तसेच दालनाला कुलूप ठोकले.

शनिवारी सकाळी मोठ्या संख्येने शिवसैनिक बाजार समिती कार्यालयात दाखल झाले. त्यांनी उपसभापती अभय पाटील यांच्या दालनात प्रवेश करून तेथील पाट्यांची तोडफोड केली. यावेळी शब्द पाळा, राजीनामा द्या अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. आंदोलकांनी उपसभापती पदाची पाटी काढून टाकत दालनाला टाळे ठोकले. तसेच हे कुलूप कोणी उघडण्याचा प्रयत्न केल्यास त्याला शिवसेना स्टाईलने धडा शिकवू, असा इशाराही संतप्त शिवसैनिकांनी दिला.

तालुकाप्रमुख बळीराम यादव म्हणाले की, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापतीपदासाठी अभय पाटील यांना दोन वर्षांची संधी देण्यात आली होती. त्यानंतर त्यांनी स्वखुशीने राजीनामा देण्याचे मान्य केले होते. त्यावेळी संचालक मंगेश जगताप हे साक्षीदार म्हणून उपस्थित होते. मात्र मुदत संपूनही पाटील पदाला चिकटून बसले आहेत. त्यांनी दिलेला शब्द पाळला नाही. त्यामुळे आम्ही त्यांच्या दालनाला कुलूप ठोकले असून यापुढे त्यांना उपसभापती म्हणून कोणतेही काम करू देणार नाही. त्यांनी तात्काळ राजीनामा दिला नाही तर त्याचा परिणाम बाजार समितीच्या कामकाजावर होईल, असा इशारा त्यांनी दिला.

दरम्यान, बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर यांना विचारणा केली असता ते म्हणाले की, उपसभापतींच्या दोन वर्षांच्या मुदतीबाबत मला कोणतीही माहिती नाही. माझ्यासमोर असा कोणताही विषय ठरलेला नव्हता. त्यामुळे त्याबाबत मी काही सांगू शकत नाही. मात्र उपसभापतीपदाच्या राजीनाम्याबाबत सभापती राम शिंदे निर्णय घेतील. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील सर्व निर्णय होइल.

या घटनेमुळे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून पुढील काळात हा वाद अधिक चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान आज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांची मासिक बैठक होती. यावेळी सभापतीसह अनेक संचालक उपस्थित होते. मात्र शिवसैनिकांनी इतर कोणत्याही पदाधिकारी किंवा संचालक यांना या प्रकरणाबाबत कोणताही उल्लेख केला नाही व मासिक सभेची कामकाज सुरळीतपणे सुरू ठेवा असे सांगतानाच आमचा विषय फक्त उपसभापती यांच्या राजीनामा पुरताच मर्यादित असल्याचे सांगितले.

SPOT NEWS

## अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी रेल्वे तातडीने सुरू करण्याची मागणी

**अहिल्यानगर । वीरभूमी-**
देशात निर्माण होत असलेल्या पेट्रोल-डिझेल टंचाईच्या पार्श्वभूमीवर तसेच पंतप्रधानांनी इंधन बचतीबाबत केलेल्या आवाहनाचा संदर्भ देत अहिल्यानगर ते पुणे इंटरसिटी रेल्वे सेवा तातडीने सुरू करण्यात यावी, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्त्या सौ. स्वाती सिरसुल यांनी केली आहे. यासंदर्भातील सविस्तर निवेदन रेल्वेमंत्री, रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना पाठवून त्यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष वेधले आहे.गेल्या अनेक वर्षांपासून अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी रेल्वेची मागणी सातत्याने होत असून विविध सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी यासाठी अनेकदा पाठपुरावा केला आहे. वृत्तपत्रांनी देखील या प्रश्नाला व्यापक प्रसिद्धी दिली; मात्र अद्याप प्रत्यक्ष रेल्वे सेवा सुरू झालेली नसल्याने नगरकरांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सौ. सिरसुल यांनी सांगितले की, त्या स्वतः २०२२ पासून या मागणीसाठी सातत्याने प्रयत्न करीत आहेत. गेल्या वर्षी काही कार्यकर्त्यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन निवेदन दिले होते, मात्र त्यानंतरही रेल्वे बोर्डाकडून अपेक्षित कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही. रेल्वे विभागाने मागील काही वर्षांत नगरच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कामे केली असल्याचेही त्यांनी नमूद केले. मनमाड ते दौंड या १८४ किलोमीटर अंतरावरील सिंगल लाईनचे डबल लाईनमध्ये रूपांतर करण्यासाठी सर्वेक्षण, प्रकल्प अहवाल तयार करणे, भूसंपादन, विद्युतिकरण, चाचण्या आदी अनेक महत्त्वाच्या प्रक्रिया रेल्वे प्रशासनाने यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत. रेल्वे अधिक सुरक्षित आणि वेगवान करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेले योगदान मोलाचे असून त्यांचे कौतुक झाले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## 'रेन गेन बॅटरी'मधून उजाड जमिनीला मिळणार नवजीवन

**अहिल्यानगर । वीरभूमी-**
महाराष्ट्रातील दोन लाखांहून अधिक हेक्टर उजाड, कोरडी आणि निर्जीव झालेली जमीन पुन्हा हिरवीगार करण्यासाठी जैवविविधता नेगेन्ट्रॉपी हरित क्रांती राबविण्याचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने मांडण्यात आला आहे. स्थानिक लोकविज्ञान, नैसर्गिक साधने आणि पावसाच्या पाण्याचे वैज्ञानिक व्यवस्थापन यांच्या माध्यमातून ही क्रांती उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. या मोहिमेमुळे फळांनी लगडलेली झाडे, पक्ष्यांचा किलबिलाट, फुलपाखरांचे नृत्य आणि समृद्ध परिसंस्था पुन्हा निर्माण होऊ शकते, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. महाराष्ट्रात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असला तरी त्यातील बहुतांश पाणी वाहून जाते किंवा उन्हामुळे बाष्पीभवन होते. परिणामी जमिनीत पुरेशा प्रमाणात पाणी मुरत नाही आणि ओलाशय टिकत नाही. यामुळे जमीन कोरडी पडते, शेतीची उत्पादकता घटते, विहिरी कोरड्या होतात आणि जैवविविधतेचा ऱ्हास होतो. अनेक भागांत जमीन मृत प्रदेशासारखी दिसू लागल्याने पर्यावरणासह शेतीसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

# जवळा परिसरात वादळी पावसाने फळबागांचे नुकसान

### केळी, डाळिंब, पपई व आंब्याच्या बागा जमीनदोस्त । सरसकट पंचनामे करून नुकसानभरपाईची मागणी

**निघोज । वीरभूमी -**
जवळा परिसरात शुक्रवारी (दि. २२) दुपारी वादळी वाऱ्यासह झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. फळबागा उद्ध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, सरसकट पंचनामे करून तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी जनतेतून होत आहे.





गेल्या दोन ते तीन दिवसांपासून परिसरात पावसाळी वातावरण होते. मात्र, हलका पाऊस पडेल असा अंदाज असताना दुपारी अचानक वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. या वादळामुळे अनेक शेतकऱ्यांच्या फळबागा काही क्षणांत उध्वस्त झाल्या.

जवळा परिसर हा कुकडी डावा कालवा क्षेत्रात येत असून, बागायती शेतीमुळे हा भाग आर्थिकदृष्ट्या समृद्ध मानला जातो. परिसरात मोठ्या प्रमाणात केळी, डाळिंब, पपई व आंब्याच्या बागा आहेत. वादळी पावसामुळे शेकडो हेक्टरवरील फळबागांचे मोठे नुकसान झाले असून, कोट्यवधी रुपयांची हानी झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

वादळामुळे अनेक ठिकाणी कच्च्या कैऱ्या मोठ्या प्रमाणात झाडांवरून खाली पडल्या. त्यामुळे यंदा शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांनाही आंब्यांचा तुटवडा जाणवण्याची शक्यता आहे. अनेक ठिकाणी कैऱ्यांचे ढीगच ढीग पाहावयास मिळाले.

तसेच जवळा व परिसरात झालेल्या वादळी वाऱ्यामुळे एसटी बसस्थानक परिसरातील काही घरांचे पत्रे उडून गेले, तर सुरू असलेल्या बांधकामांचेही नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांच्या सोलर पंपावरील साहित्य उडून गेल्याने सोलर यंत्रणेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

संबंधित तहसीलदार व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नुकसानग्रस्त भागांची तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत व शेतकऱ्यांना त्वरित नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी नागरिक व शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## वादळाने झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा : आ. काळेंच्या सुचना

**कोपरगाव । वीरभूमी-**
तालुक्यात शुक्रवार दि.२२ रोजी सायंकाळी सातच्या सुमारास अचानक विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्याने अनेक घरांचे पत्रे उडून गेले तर काही घरांच्या भिंती कोसळल्या आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबांच्या संसारोपयोगी वस्तू उघड्यावर पडल्या तसेच फळबागांचे आणि उघड्यावर ठेवलेल्या कांद्याचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे आणि नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. सदर नुकसानीची माहिती घेऊन आ. आशुतोष काळे यांनी महसूल आणि कृषी विभागाला वादळाने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहे.



शुक्रवारी सायंकाळी कोपरगाव मतदार संघातील अनेक गावांना या वादळी पावसाचा तडाखा बसला असून अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने विजेचे खांब वाकले आणि वीज वाहिन्या तुटल्याने वीजपुरवठाही खंडित झाला आहे. जोरदार वाऱ्यामुळे काही नागरिकांच्या घराचे पत्रे उडाले तर काही घराच्या भिंती कोसळल्या आहे. तसेच फळबागांसह काढणीला आलेल्या डाळिंब बागांचेही मोठे नुकसान झाले. वादळाने साठवणुकीसाठी झाकून ठेवलेल्या कांद्यावरचे आच्छादन उडून गेल्याने शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान झाले आहे.

नुकसानग्रस्तांना शासनाकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत व नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी नेहमी प्रमाणे राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी सांगितले आहे. मतदारसंघातील एकही बाधित नुकसानग्रस्त शेतकरी किंवा नागरिक पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही याची काळजी घ्या. पंचनामे करतांना कोणताही दुजाभाव किंवा दिरंगाई न करता पंचनामे तातडीने पूर्ण करा अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी महसूल आणि कृषी अधिकाऱ्यांना दिल्या आहे.

## पारनेर येथील प्रजापिता ब्रह्मकुमारी केंद्रात उमलले दुर्मीळ 'मे फ्लॉवर'

### निसर्गप्रेमींसाठी ठरतेय आकर्षणाचे केंद्र

**पारनेर । वीरभूमी-**
निसर्गाचा अनमोल ठेवा आणि ऋतू बदलाचे संकेत देणारे दुर्मीळ 'मे फ्लॉवर' पारनेर येथील प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयात अत्यंत देखण्या रूपात उमलले आहे. येथील सेवाकेंद्राच्या संचालिका ब्रह्मकुमारी साधना दीदी यांनी काही दिवसांपूर्वी केंद्राच्या प्रांगणात एका कुंडीत या मे फ्लॉवरचे रोप लावले होते.



> निसर्गातील प्रत्येक घटकातून आपल्याला काहीतरी शिकायला मिळते. कडक उन्हाळ्यातही आपले सौंदर्य टिकवून ठेवणारे हे मे फ्लॉवर आपल्याला प्रतिकूल परिस्थितीतही आनंदी आणि सकारात्मक राहण्याचा संदेश देते.
>
> **- ब्रह्मकुमारी साधना दीदी,** संचालिका.

सध्या या रोपाला अतिशय सुंदर, गडद लाल (रेड) रंगाचे आणि टुमदार फूल आले असून ते सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहे. मे फ्लॉवर हे नाव सूचित करते त्याप्रमाणे हे फूल प्रामुख्याने मे महिन्याच्या कडक उन्हात उमलते. वर्षभर सुप्त अवस्थेत राहणारे हे कंदवर्गीय रोप उन्हाळ्याच्या शेवटी आणि पावसाळ्याच्या सुरुवातीला अचानक बहरते.

पारनेर येथील ब्रह्मकुमारी केंद्राच्या पवित्र आणि शांत वातावरणात उमललेल्या या फुलाने परिसराच्या सौंदर्यात भर घातली आहे. हे फूल आकाराने गोलाकार असून एखाद्या छत्रीसारखे किंवा फुटबॉलसारखे दिसते. यालाच 'ब्लड लिली' असेही म्हटले जाते.

ग्रामीण भागात अशा प्रकारची दुर्मीळ आणि वैशिष्ट्यपूर्ण फुले पाहायला मिळणे खूपच दुर्मिळ असते. त्यामुळे पारनेर परिसरातील निसर्गमित्र, पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिक हे फूल पाहण्यासाठी ब्रह्मकुमारी केंद्रात गर्दी करत आहेत. निसर्गप्रेमींसाठी हा एक अनोखा आनंद आणि पर्वणीच ठरली आहे. अनेक जण या मनमोहक फुलाची छायाचित्रे आपल्या कॅमेऱ्यात आणि मोबाईलमध्ये टिपत आहेत.

# माध्यमिक शिक्षक संघाची शिक्षण आयुक्तांसोबत बैठक

### २५ मे पर्यंत प्रश्न न सोडवल्यास आयुक्तांसमोर तीव्र आंदोलन : आ. सत्यजित तांबे

**अहिल्यानगर । वीरभूमी-**
शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांच्या उपस्थितीत तसेच मा. आमदार सत्यजित तांबे, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ. महेश पालकर आणि शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांच्यासोबत पुणे येथे नुकतेच महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस नाशिक विभागातील सर्व शिक्षणाधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.

या बैठकीत महाराष्ट्र शिक्षक संघटनेच्या वतीने एस. डी. भिरुड, राज्य फेडरेशन संघाचे कोषाध्यक्ष राजेंद्र लांडे, शिक्षक नेते तसेच चेअरमन आप्पासाहेब शिंदे, दिलीप काटे तसेच अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे, सेक्रेटरी अमोल ठाणगे व दिपक दरेकर यांनी सहभाग घेतला.

बैठकीमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये शिक्षकांचे रखडलेले वेतन, संच मान्यता, दप्तर दिरंगाई, शालार्थ मान्यता, पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापक मान्यता, डी.एड.-बी.एड. प्रमोशन मान्यता, अकरावी प्रवेश प्रक्रिया, समायोजन, शालार्थ आयडी तसेच विविध प्रशासकीय कामांमध्ये होणारी अडवणूक आदी महत्त्वाच्या विषयांचा समावेश होता.

तसेच बैठकीमध्ये अंशतः अनुदानित शिक्षकांचे नियमित वेतन, शालार्थ आयडी प्रकरणे, संच मान्यतेतील त्रुटी, शिक्षक भरती प्रक्रियेतील अडचणी, रोस्टर तपासणी, समायोजन, टीईटी अट, डीसीपीएस प्रकरणे, पर्यवेक्षक व मुख्याध्यापक मान्यता, टप्पा अनुदान, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन, प्राथमिक व माध्यमिक विभागातील प्रलंबित विषय, अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, पवित्र पोर्टलमधील तांत्रिक त्रुटी तसेच ग्रामीण व आदिवासी भागातील शिक्षकांच्या प्रश्नांवरही सकारात्मक चर्चा करण्यात आली. संघटनेने शिक्षण विभागासमोर विविध मागण्यांचे निवेदन सादर करून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण विभागाकडे विविध प्रलंबित विषय तत्काळ मार्गी लावण्याची मागणी केली. शिक्षण क्षेत्रातील अनेक प्रश्नांमुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात अडचणीत असल्याचे बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले. यावेळी शिक्षण आयुक्त व संबंधित अधिकाऱ्यांनी प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेत लवकरात



लवकर योग्य तो निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. मात्र, प्रलंबित प्रश्नांचे तातडीने निराकरण न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र शिक्षक संघटनेच्या वतीने देण्यात आला.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## एक रक्तदाता अनेकांचे जीवन वाचविणारा देवदूत : ॲड. मोनाश्री अहिरे

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथील हिमोटॉलॉजी विभागामध्ये रक्तदान शिबिर विषयक जनजागृती तसेच जिल्ह्यात निर्माण होणाऱ्या रक्तटंचाईवर उपाययोजना यासंदर्भात मदत सोशल फाउंडेशनच्या वतीने विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मदत सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा अँड. मोनाश्री अहिरे यांनी जिल्ह्यातील नागरिकांना नियमित रक्तदान करण्याचे जाहीर आवाहन केले. रक्तदान हे समाजाप्रती असलेले सर्वात मोठे कर्तव्य असून एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमादरम्यान जिल्हा रुग्णालयातील समन्वयक डॉ. आशिष इरमल यांनी थॅलेसेमिया, सिकल सेल आणि हिमोफिलिया यांसारख्या गंभीर आजारांमध्ये रुग्णांना वारंवार रक्ताची आवश्यकता भासत असल्याची माहिती दिली. अनेक रुग्णांचे जीवन हे नियमित रक्तपुरवठ्यावर अवलंबून असल्याने समाजातील प्रत्येक नागरिकाने रक्तदानासाठी पुढे येण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. या उपक्रमाची विशेष बाब म्हणजे ॲड. मोनाश्री अहिरे यांनी स्वतः रक्तदान करून जनजागृती मोहिमेची सुरुवात केली. यामुळे उपस्थित नागरिकांमध्ये रक्तदानाविषयी सकारात्मक संदेश पोहोचला.कार्यक्रमास ॲड. तहसीन शेख, श्रीधर शेलार यांच्यासह मदत सोशल फाउंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## न्यू आर्ट्स कनिष्ठ महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालय, अहिल्यानगर या गौरवशाली परंपरा लाभलेल्या शैक्षणिक संस्थेने सन २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (एच.एस.सी.) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांच्या सन्मानार्थ महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थी गुणगौरव समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रामचंद्रजी दरे यांनी गुणवंत विद्यार्थी हे महाविद्यालयाचे खरे भूषण असून त्यांच्या यशामुळे संस्थेची शैक्षणिक परंपरा अधिक समृद्ध होत असते, असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी सातत्य, मेहनत आणि शिस्त यांच्या जोरावर यश संपादन केल्याचे सांगत त्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल तब्बल ९९.२८ टक्के लागला असून कु. कोठुळे प्रणाली बाबासाहेब हिने ८८.०० टक्के गुण मिळवत शाखेत प्रथम क्रमांक पटकावला. कॉमर्स शाखेचा निकाल ९१.७० टक्के लागला असून कु. गायकवाड क्षितिजा अर्जुन हिने ९२.३३ टक्के गुणांसह महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला. कला शाखेचा निकाल ९२.८९ टक्के लागला असून कु. सोनवणे तनुजा पांडुरंग हिने ८६.१७ टक्के गुण मिळवत शाखेत प्रथम क्रमांक संपादन केला. यावेळी प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. सौ. कल्पना कानवडे यांनी केले. या गुणवंत विद्यार्थी गुणगौरव समारंभास अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार दीपलक्ष्मी म्हसे आदी उपस्थित होते.

# पाथर्डीत मोबाईल चोरट्यास अटक

### ३ लाख २० हजारांचे १६ मोबाईल जप्त । तांत्रिक विश्लेषण व सीसीटीव्हीच्या मदतीने पाथर्डी पोलिसांची कारवाई

**● पाथर्डी । वीरभूमी –**

शहरातील आठवडे बाजार, बसस्थानक व इतर गर्दीच्या ठिकाणी मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीस पाथर्डी पोलिसांनी तांत्रिक माहिती व कसून तपासाच्या आधारे शिताफीने अटक केली. त्याच्याकडून तब्बल ३ लाख २० हजार रुपये किमतीचे १६ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत.



याबाबत माहिती अशी की, मार्च महिन्यात दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास सागर रावसाहेब बर्डे (रा. निपाणी जळगाव, ता. पाथर्डी) हे मार्केट यार्ड परिसरात चिंच विक्रीसाठी आले होते. यावेळी त्यांच्या खिशातील २४ हजार रुपये किमतीचा मोबाईल अज्ञात चोरट्याने लंपास केला. याप्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने शहरातील विविध सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा शोध घेण्यात आला. तपासादरम्यान शुभम कचरू दिनकर (रा. आंबेडकर नगर, पाथर्डी) व आलोक किरण ससाणे (वय २१, रा. मेहेरबाबा टेकडी, पाथर्डी) यांची नावे निष्पन्न झाली.

यानंतर पोलिसांनी आलोक ससाणे यास ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता, त्याच्याकडून एकूण १६ मोबाईल जप्त करण्यात आले. जप्त मोबाईलची किंमत ३ लाख २० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधीक्षक कलुबर्मे, पोलिस अधिकारी निरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विलास पुजारी, पोलिस उपनिरीक्षक विशाल लहाने, पोलिस हवालदार बाबासाहेब बडे, भगवान गरगडे, सागर बुधवंत, ज्ञानेश्वर इलग, संजय जाधव, इजाज सय्यद आदींच्या पथकाने केली. या कारवाईचे स्वागत होत आहे.

## संरक्षण मंत्री राजनाथ सिंग व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आ. आशुतोष काळे यांचेकडून स्वागत



**● कोपरगाव । वीरभूमी–**

देशाचे कर्तव्यदक्ष संरक्षण मंत्री ना. राजनाथ सिंग व राज्याचे कार्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस अहिल्यानगर दौऱ्यावर आले असता आ. आशुतोष काळे यांनी शिर्डी येथे कोपरगाव मतदारसंघातील नागरिकांच्या वतीने त्यांचे स्वागत केले.

शिर्डी– सावळीविहीर (एम. आय.डी.सी.) येथे आयोजित क्षेपणास्त्र संकुल व तोफगोळा (आर्टिलरी शेल) उत्पादन प्रकल्प लोकार्पण सोहळ्यासाठी देशाचे संरक्षणमंत्री ना. राजनाथजी सिंग साहेब व राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता आमदार आशुतोष काळे यांनी शिर्डी येथे त्यांचे कोपरगाव मतदारसंघाच्या वतीने स्वागत केले.

यावेळी विधान परिषदेचे सभापती ना. प्रा. राम शिंदे, जिल्ह्याचे पालक मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील आदी सह विविध मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## उंचखडक बुद्रुक जिल्हा परिषद शाळेचे १५ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी

**● अकोले । वीरभूमी–**

मागील वर्षी इयत्ता पाचवीचा वर्ग सुरू झाल्यापासून उंचखडक बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत उज्ज्वल यशाची परंपरा निर्माण केली आहे. नवोदय विद्यालय, सैनिक शाळा, लक्षवेध, गणित–विज्ञान, सावित्रीबाई फुले यांसह विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी शाळेचे नाव जिल्हा पातळीवर झळकवले आहे.



आता नुकताच जाहीर झालेल्या पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या निकालात शाळेतील १५ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. यामुळे तीन वर्षांपूर्वी बंद पडण्याच्या स्थितीत असलेली ही शाळा आज गुणवत्तेच्या दृष्टीने राज्य पातळीवर ओळख निर्माण करत असल्याचे चित्र आहे. या कामगिरीचे जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी कौतुक केले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये विराज बडे, निशिता बोराडे, विराज वाकचौरे, ईश्वरी पवार, शौर्य काकड, स्वरा शिंदे, सोहम खोकले, ईशिता बोराडे, शौर्यजीत वाकचौरे, नेहा मधे, सार्थकी सोनवणे, ईश्वरी कोरडे, सार्थक लहामटे, सुदर्शन म्हस्के आणि सानिध्य भोयर यांचा समावेश आहे.

यातील निशिता बोराडे आणि स्वरा शिंदे या दोन विद्यार्थिनी नवोदय विद्यालयासाठी पात्र ठरल्या आहेत, तर सोहम खोकले आणि ईशिता बोराडे हे विद्यार्थी सैनिक शाळेसाठी पात्र ठरले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांनी या वर्षात एकूण १८ विद्यार्थ्यांच्या यशाची नोंद केली आहे.

या यशामध्ये शिक्षक गोविंद खोकले आणि बडे मॅडम यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. शासनाच्या शैक्षणिक उदासीन धोरणामुळे शिक्षकांची कमतरता असतानाही शाळा व्यवस्थापन समितीने एम. ए. पदवीधर बडे मॅडम यांची मानधन तत्त्वावर नियुक्ती करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून दिले.

या यशात गोविंद खोकले यांचा मोठा वाटा असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब दोर्गे, रवी रुपवते, विक्रम गायकर, काळू तपासे, तत्कालीन गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत आणि केंद्रप्रमुख सुनिल नरसाळे यांचे सहकार्य लाभल्याचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. सागर शिंदे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

## संत तुकाराम महाराज विष्णू स्वरूपच होते

### ह.भ.प. गणेश महाराज शास्त्री । रामवाडी येथे पारायण व कीर्तन महोत्सव

**● कोपरगाव । वीरभूमी–**

संत तुकाराम महाराज हे विष्णू स्वरूपच होते, असे त्यांचे तत्कालीन विरोधक रामेश्वर भट्ट यांनीही मान्य केले आहे. त्यामुळे आज कोणीही काही म्हटले तरी त्याला विशेष अर्थ नाही. विरोधकांनी केलेल्या वर्णनावरूनच त्यांचे मूळ स्वरूप स्पष्ट होते आणि आज सुरू असलेल्या तुकाराम महाराजांच्या अभंग व गाथांवरील चर्चा निरर्थक असल्याचे प्रतिपादन ह. भ. प. गणेश शास्त्री महाराज यांनी केले.



तालुक्यातील रामवाडी येथे आयोजित संत तुकाराम गाथा पारायण व कीर्तन महोत्सवात द्वितीय पुष्प गुंफताना ते बोलत होते.

कीर्तन सेवेसाठी तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम हा रामेश्वर भट्टांचा अभंग घेतला होता. ते पुढे म्हणाले की, आज आपण एकमेकांचे वर्णन किंवा स्तुती करतो, परंतु एखाद्या व्यक्तीचे वर्णन त्याच्या विरोधकाने केले असेल तर ते अधिक महत्त्वाचे ठरते.

संत तुकाराम महाराजांचे नामस्मरण केल्याने मनातील भय, चिंता आणि नकारात्मकता दूर होते. नामस्मरणाने मनाला शांती मिळते आणि जीवनात आध्यात्मिक बळ प्राप्त होते. ऐसा तुकोबा समर्थ । जेणे केला हा पुरुषार्थ या ओळींमधून संत तुकाराम महाराजांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे. 'पुरुषार्थ' म्हणजे जीवनाचे अंतिम ध्येय साध्य करणे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे जीवनातील चार पुरुषार्थ सांगितले आहेत. तुकोबारायांनी भक्तीमार्ग स्वीकारून समाजाला योग्य दिशा दिली आणि मोक्षमार्ग सुलभ करून दाखवला.

रामेश्वर भट्टांनी सुरुवातीला संत तुकाराम महाराजांविषयी विरोधाची भूमिका घेतली होती. मात्र पुढे तुकोबारायांच्या आध्यात्मिक सामर्थ्याची जाणीव झाल्यानंतर त्यांनी त्यांना साक्षात विष्णूचे स्वरूप मान्य केले, अशी संतचरित्रातील नोंद आढळते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमावेळी संगीत साथ संगीत अलकार अरुण महाराज, संदीप महाराज वैद्य, गणेश महाराज तुपे, ह. भ. प. भाकरे महाराज, वाल्मीक महाराज आदींनी केली. तसेच ज्ञानामृत व महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महसूल सहाय्यकपदी निवडीबद्दल शुभम मुंढे यांचा सत्कार

### आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या उपस्थितीत जल्लोषात मिरवणूक

**● अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील दुर्गम आदिवासी टिटवी गावातील शुभम मोहनराव मुंढे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून मंत्रालयीन महसूल सहाय्यक पदी निवड झाली आहे. या यशानिमित्त गावकऱ्यांनी डीजेच्या तालावर वाजत–गाजत मिरवणूक काढून आनंद साजरा केला. तसेच आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते शुभम मुंढे यांचा सन्मान करण्यात आला.




टिटवीसारख्या दुर्गम आदिवासी भागातून आलेल्या शुभम मुंढे यांनी कोणतेही खासगी शिकवणी न लावता पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळवले आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण राजूर येथील जिल्हा परिषद शाळेत झाले असून बारावीपर्यंतचे शिक्षण त्यांनी नवोदय विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे पूर्ण केले. त्यांनी मॅकेनिकल अभियांत्रिकी पदवी तसेच एमबीएचे शिक्षण पुण्यातून पूर्ण केले आहे.

ते भाजपचे माजी तालुकाध्यक्ष मोहन मुंढे यांचे चिरंजीव असून आई पुष्पा मुंढे या गृहिणी आहेत.

टिटवी येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा जिल्हा सरचिटणीस सिताराम भांगरे होते. यावेळी भाजपा जिल्हा सोशल मीडिया सेलचे संयोजक भाऊसाहेब वाकचौरे, मच्छिंद्र मंडलिक, रमेश राक्षे, धनंजय संत, रासपचे भगवान करवर, बाळासाहेब साबळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज तळपे यांनी केले तर आभार मोहनराव मुंढे यांनी मानले.

> आदिवासी समाजातील मुले प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन यश संपादन करीत आहेत ही भूषणावह गोष्ट आहे.
>
> **– आ. डॉ. किरण लहामटे**

> मोहन मुंढे यांनी सामाजिक चळवळीत कार्य करताना गोरगरीब आदिवासी समाजाला न्याय देण्याचे कार्य केले. त्याचेच फलित म्हणजे शुभम यांचे यश आहे. शुभम यांनी नोकरीच्या माध्यमातून वडिलांच्या सामाजिक बांधिलकीचा वारसा पुढे न्यावा.
>
> **– सिताराम भांगरे**

# शब्दगंधच्या माध्यमातून भाषा साहित्य व संस्कृतीचे जतन

## कृषीमंत्री दत्तात्रय भरणे | १७ व्या राज्यस्तरीय संमेलनाचे शानदार उद्घाटन; पुरस्काराचे वितरण

**● अहिल्यानगर | वीरभूमी–** मराठी भाषा, आपले साहित्य आणि आपल्या संस्कृतीचे संवर्धन करण्याचे काम शब्दगंध साहित्य संमेलनाच्या माध्यमातून गेल्या १६ वर्षापासून होत आहे. यामुळे अशी संमेलने ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी केले.

शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्याच्या वतीने आयोजित १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. संमेलन अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे, स्वागताध्यक्ष नगरसेवक सुरेश बनसोडे, आ. संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, नगरसेवक कुमार वाकळे, संपत बारस्कर, स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे, सचिन जगताप, नगरसेवक अविनाश घुले, प्रकाश भागानगरे, संयोजन समिती सदस्य संजय खामकर, जीवनगौरव पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते अशोक गायकवाड, प्रा. गणी पटेल, बापूसाहेब भोसले, शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, संस्थापक सुनिल गोसावी, खजिनदार भगवान राऊत, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे आदी मान्यवर यावेळी विचारपिठावर उपस्थित होते. यावेळी मंत्री भरणे म्हणाले, मी राज्याचा कृषी मंत्री असलो तरी आधी मी एका शेतकऱ्याचा मुलगा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे दुःख, शेतकऱ्यांच्या वेदना, शेतकऱ्यांची कष्ट, त्यांच्या अडीअडचणी, समस्या या मला चांगल्या माहीत आहेत.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे म्हणाले, शब्दगंधच्या माध्यमातून सुरू झालेले ही साहित्य संमेलनाची परंपरा इथून पुढच्या काळातही अशाच प्रकारे निरंतरपणे चालू राहील. यावेळी प्रा. डॉ. गणी पटेल व सामाजिक कार्यकर्ते अशोक गायकवाड यांना शब्दगंध जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. भारत गाडेकर, वसंत डंबाळे, शेषराव पठाडे, प्रशांत सूर्यवंशी, हौशीनाथ बोर्डे, दिगंबर गोंधळी, दत्तू रसाळ आणि सहकाऱ्यांनी उद्घाटनापूर्वी शानदार शाहिरी जलसा कार्यक्रम सादर केला. या सूत्रसंचालन भगवान राऊत यांनी केले. प्राचार्य जी. ढाकणे, प्रा. डॉ. अशोक कानडे, प्रा. डॉ. तुकाराम गोंदकर, प्रा. डॉ. अनिल गरजे, सुभाष सोनवणे, बबनराव गिरी, रविंद्र दानापुरे, स्वाती ठुबे, हर्षल आगळे, राजेंद्र चोभे, रमेश वाघमारे आदींनी परिश्रम घेतले.



# तुळजवाडी येथे बंद घराची भिंत फोडून घरफोडी

### तीन तोळ्यांहून अधिक सोन्यासह रोख रक्कम लंपास

**● पाथर्डी | वीरभूमी–** पाथर्डी तालुक्यातील पूर्व भागातील तुळजवाडी येथे मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी बंद घराला लक्ष्य करत घरफोडी केल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरट्यांनी घराच्या मागील भिंतीच्या विटा काढून आत प्रवेश करत तीन तोळ्यांहून अधिक सोन्याचे दागिने, चांदीचे चाळ आणि रोख रक्कम असा मुद्देमाल चोरून नेला आहे. या प्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या संदर्भात संदीप भीमराव कराड (वय ४०, रा. तुळजवाडी, ता. पाथर्डी) यांनी पोलिसांत अधिकृत फिर्याद दिली आहे. कराड कुटुंब गावात शेती व्यवसाय करून उदरनिर्वाह करत असून त्यांचा मुलगा शुभम कराड हा देशसेवेसाठी जम्मू-काश्मीर येथे भारतीय सैन्यात कार्यरत आहे.

फिर्यादीनुसार, २० मे रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास कराड कुटुंबीयांनी नेहमीप्रमाणे जेवण आटोपून घराच्या दोन्ही खोल्यांना कुलूप लावले आणि सर्वजण घरासमोरील अंगणात झोपण्यासाठी गेले. याच संधीचा फायदा घेत दबा धरून बसलेल्या चोरट्यांनी मध्यरात्री घराच्या पाठीमागील कच्च्या भिंतीच्या विटा काढून घरात प्रवेश केला.

दुसऱ्या दिवशी पहाटे कुटुंबीयांना घराच्या मागील भिंतीला भगदाड पडल्याचे आणि विटा काढल्याचे दिसून आले. घरात प्रवेश केल्यानंतर सर्व सामान अस्ताव्यस्त अवस्थेत आढळले. पत्र्याच्या पेटीत ठेवलेला दागिन्यांचा डबा गायब असल्याचे स्पष्ट झाले.

परिसरात शोध घेतला असता घरामागील शेतात चोरट्यांनी टाकून दिलेला रिकामा डबा, सुटकेस, कापडी बॅग व कपडे आढळून आले. मात्र त्यातील मौल्यवान दागिने व रोकड लंपास झाल्याचे समोर आले आहे. पुढील तपास पाथर्डी पोलीस करत आहेत.

# कोपरगाव आगारासाठी ५ नवीन बस मंजूर; आ. आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्याला यश

## ग्रामीण भागातील दळणवळणाला मिळणार बळ

**● कोपरगाव | वीरभूमी–** विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना बस सेवेच्या येणाऱ्या अडचणी, विशेषतः विद्यार्थ्यांची प्रवासातील गैरसोय दूर करण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. कोपरगाव बस आगाराला नवीन ५ जिजाऊ बसेस मंजूर करण्यात आल्या असल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली.



या संदर्भात आमदार काळे यांनी २९ एप्रिल रोजी राज्याचे परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक यांची भेट घेऊन कोपरगाव बस आगारासाठी तातडीने नवीन बस देण्याची मागणी केली होती. त्यानंतर सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवण्यात आला.

कोपरगाव मतदारसंघातील ग्रामीण भागातील दळणवळणाच्या दृष्टीने कोपरगाव बसस्थानक अत्यंत महत्त्वाचे आहे. शिर्डी, मनमाड, वैजापूर, श्रीरामपूर, संगमनेर, नाशिक या शहरांना जोडणारे कोपरगाव बस स्थानक मध्यवर्ती ठिकाणी आहे. तीर्थक्षेत्र शिर्डी जवळ असल्याने भाविकांसाठी तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थी, नागरिक व नोकरदार वर्गासाठी बससेवा अत्यंत आवश्यक आहे.

बस संख्या कमी असल्याने काही फेऱ्या अनियमित झाल्या होत्या, त्यामुळे शाळा-महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी, नोकरदार आणि प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या पाठपुराव्यातून आता कोपरगाव बस आगाराला पाच नवीन बसेस उपलब्ध झाल्यामुळे विस्कळीत झालेली वाहतूक व्यवस्था पूर्ववत होण्यास मदत होणार आहे.

या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना वेळेवर शाळेत पोहोचता येणार असून सर्वसामान्य प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ आणि सुखकर होणार आहे. या निर्णयासाठी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक तसेच पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.

# धायतडकवाडीमध्ये हॉटेल जगदंबामध्ये वीजचोरी उघड; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**● पाथर्डी | वीरभूमी–** महावितरणच्या भरारी पथकाने धायतडकवाडी परिसरातील 'हॉटेल जगदंबा' येथे केलेल्या तपासणीत वीजचोरीचा प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत महावितरणच्या भरारी पथकातील अतिरिक्त कार्यकारी अभियंता अनिलकुमार तिवारी यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, दि. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी महावितरणच्या भरारी पथकाने धायतडकवाडी येथील रघुनाथ काशिनाथ गर्जे यांच्या 'हॉटेल जगदंबा' या व्यावसायिक वीजजोडणीची तपासणी केली.

तपासणीदरम्यान मीटरच्या आधी सर्व्हिस वायरला दोन कोअरची काळ्या रंगाची अतिरिक्त वायर जोडून ती थेट हॉटेलच्या मेनस्विचला जोडण्यात आल्याचे आढळून आले. पथकाने घटनास्थळावरून सुमारे दहा फूट लांबीची वायर जप्त केली असून, ती पंच व अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सीलबंद करण्यात आली.

महावितरणच्या अहवालानुसार, मागील १२ महिन्यांपासून व्यावसायिक वापरासाठी वीजचोरी करण्यात येत असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी ९९१ युनिट वीजवापरापोटी संबंधितांना २२ हजार ८४० रुपयांचे दंडात्मक बिल देण्यात आले. तसेच, गुन्हा तडजोडीसाठी पाच हजार रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मात्र, संबंधितांनी दंडाची रक्कम भरली नसल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी रघुनाथ काशिनाथ गर्जे व उत्तम रघुनाथ गर्जे यांच्याविरुद्ध पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रतनवाडी-साम्रद मुक्कामी एसटी सेवा पुन्हा सुरु

## समाजसेवक अनंत घाणे यांच्या पाठपुराव्याला यश | दुर्गम आदिवासी भागातील प्रवाशांना मोठा दिलासा

**● अकोले | वीरभूमी–** तालुक्यातील सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या दुर्गम आदिवासी रतनवाडी व साम्रद गावांसाठी सुरू असलेली, आदिवासी हृदयसम्राट कै. मधुकरराव पिचड यांच्या पुढाकाराने जनसेवेसाठी सुरू करण्यात आलेली मुक्कामी एसटी बससेवा तांत्रिक कारणास्तव बंद करण्यात आली होती. ही सेवा आता पुन्हा सुरू करण्यात आली असून समाजसेवक अनंत महादू घाणे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे.

या निर्णयामुळे आदिवासी भागातील शालेय विद्यार्थी, रुग्ण, वयोवृद्ध, महिला, गरोदर माता तसेच सर्वसामान्य ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

एसटी महामंडळाने काही कारणास्तव रतनवाडी व साम्रद या दुर्गम भागातील मुक्कामी बससेवा बंद केली होती. त्यामुळे नागरिकांना शिक्षण, उपचार, नोकरी तसेच शासकीय व न्यायालयीन कामांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. रात्री मुक्कामी बस नसल्याने अनेकांना अकोले, राजूर किंवा शेंडी येथे मुक्काम करावा लागत होता. पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या रतनवाडी-साम्रद परिसरातील पर्यटकांनाही याचा फटका बसत होता.

या समस्येची दखल घेत समाजसेवक अनंत महादू घाणे यांनी अकोले आगार व्यवस्थापक सुरेश दराडे तसेच बाळासाहेब गंभीरे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. ग्रामस्थांच्या वतीने निवेदन सादर करत मुक्कामी बससेवा पुन्हा सुरू करण्याची आग्रही मागणी करण्यात आली.

या प्रयत्नांना यश येत साम्रद मुक्कामी बससेवा तात्काळ सुरू करण्यात आली असून रतनवाडी मुक्कामी बस १८ मे २०२६ पासून पुन्हा सुरू करण्यात आली आहे. नव्या वेळापत्रकानुसार ही बस संगमनेर येथून दुपारी ३.३० वाजता सुटेल, राजूर येथे ५.०० वाजता, शेंडी येथे ५.३० वाजता पोहोचेल आणि रतनवाडी येथे ६.३० वाजता मुक्कामी राहील. सकाळी ६.३० वाजता बस पुन्हा प्रस्थान करून ९.३० वाजता संगमनेर येथे पोहोचेल.

तसेच १५ जून २०२६ पासून दुपारी १२.३० वाजता राजूर-रतनवाडी-घाटघर-मुरशेत-शेंडी-राजूर अशी नवीन बससेवा सुरू करण्याबाबतही सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे दुर्गम भागातील नागरिकांची प्रवासाची मोठी सोय होणार आहे.



या निर्णयानंतर आगार व्यवस्थापक सुरेश दराडे, वाहतूक नियंत्रक देशमुख, डि. व्ही. खाडे तसेच बाळासाहेब गंभीरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दराडे यांनी रतनवाडी व साम्रद तसेच आगामी दुपारची बससेवा कायमस्वरूपी सुरू राहील व ती बंद होणार नाही, अशी ग्वाही दिली.

सेवा पुन्हा सुरू झाल्यानंतर ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करत एसटी बसचे पूजन केले. तसेच एसटी महामंडळ व समाजसेवक अनंत घाणे यांचे आभार मानत आनंदोत्सव साजरा केला.